
ARTHA, Poona 4
Tel. 55627


LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

# अर्थ

वर्ष४२ | पुणे, बुधवार, १८ सप्टेंबर, १९६८ | अंक १८





## पाणी म्हणजेच जीवन



किर्लोस्कर

## किर्लोस्कर पंप पाहिजे तेथें आणि पाहिजे तेव्हां पाणीपुरवठा करतात.



किर्लोस्कर पंप—राष्ट्रीय जीवनाचें एक अंग

आपल्या राष्ट्रीय जीवनांत किर्लोस्कर पंप महत्त्वाची भूमिका बजावीत आहेत. गेल्या अर्धशतकाहून अधिक काळ किर्लोस्कर पंप देशांत सर्वत्र शेती, कारखाने व शहरें यांची पाणीपुरवठ्याची गरज अत्यंत कार्यक्षमतेनें पुरी करीत आहेत. शेती व कारखाने यांना लागणारे विविध प्रकारचे पंप आपल्या आवश्यकतेनुसार मिळूं शकतात.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**
उद्योग भवन, टिळक रोड, पुणे-२. (महाराष्ट्र)

STUSA KM 6/67

## हिंदमधील राज्यांतील मोटारगाड्यांची विभागणी

हिंदमधील मोटारगाड्यांची संख्या व त्यांची निरनिराळ्या राज्यांत झालेली विभागणी ह्यासंबंधीचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे. अहवालात जमा केलेली माहिती मनोरंजक आहे. इंडिअन रोड्स अँड ट्रँन्सपोर्ट डेव्हलपमेंट असोसिएशनने ५ वर्षापूर्वी मोटारगाड्यांविषयी माहिती देणारे एक कोष्टक तयार केले होते. त्यावरून असे दिसून आले होते की राज्यांची औद्योगिक प्रगती आणि त्यामधील मोटारगाड्यांची संख्या ह्यांचा निकटचा संबंध असतो. महाराष्ट्र आणि प. बंगाल ही औद्योगिक दृष्ट्या आघाडीवर असलेली राज्ये आहेत. ह्या दोन राज्यांत मिळून देशातील एकूण मोटारगाड्यांपैकी एकतृतीयांशापेक्षा अधिक मोटारगाड्या आहेत. देशातील मोटारगाड्यांची एकूण संख्या १२ लाखांच्या आसपास आहे. नव्या अहवालात मोटारगाड्यांच्या विभागणीबाबत हीच प्रवृत्ती दिसून येत आहे. मालवाहतूक करणाऱ्या मोटारगाड्यांची दोन्ही राज्यांतील संख्या इतर राज्यांच्या मानाने सर्वात अधिक आहे; त्याचप्रमाणे खाजगी गाड्या, मोटार-सायकली आणि बसेस यांची संख्याही अधिक आहे. मद्रास राज्यांतील मोटारगाड्यांची संख्या महाराष्ट्र व बंगालच्या मानाने निम्मी आहे. परंतु त्या राज्यातील मोटार-सायकली व स्कूटर्सची संख्या मात्र मोटारगाड्यांइतकी आहे. दक्षिण हिंदुस्थानात एकंदरीने स्कूटर्स वापरण्यावर अधिक भर दिसून येतो. आंध्रप्रदेश आणि म्हैसूर राज्यात मद्रास इतक्याच स्कूटर्स आहेत. उत्तर प्रदेश हे औद्योगिकदृष्ट्या फारसे पुढारलेले नाही. त्यामुळे तेथे दरमाणशी मालवाहू मोटारी आणि प्रवासी मोटारी ह्यांची संख्या सर्वात कमी आहे. उत्तर प्रदेशात बसेसची संख्या मात्र सर्वात अधिक म्हणजे १० हजार आहे. महाराष्ट्र व प. बंगालपेक्षा तेथील बसेसची संख्या ३ हजारांनी अधिक आहे.

---

## झेकोस्लोव्हाकिआवरील रशिअन आक्रमणाची पार्श्वभूमी

गेल्या महिन्यात रशिअन लष्कराने झेकोस्लोव्हाकिआ ह्या चिमुकल्या देशात घुसून तेथे रशिआच्या मर्जीतले सरकार आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर झेक व रशिअन नेते ह्यांच्यात विचारविनिमय होऊन रशिआने लष्कर काढून घेण्याचे ठरविले. झेक जनतेला जुनी स्टॅलिनवादी राजवट पसंत नव्हती, वृत्तपत्रावरील बंधने नको होती, सरकार व कम्युनिस्ट पक्ष ह्यांच्या अधिकारांचे स्पष्टीकरण हवे होते. पण, ह्याशिवाय एका जबर आर्थिक दुखण्यानेही त्या देशाला पछाडले आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस झेक देश रशिआने जर्मनीच्या वर्चस्वातून मुक्त केला. त्यानंतर त्या देशाची अर्थव्यवस्था ८० टक्क्यांपर्यंत रशिआच्या अर्थव्यवस्थेशी जखडण्यात आली. आज तो देश खनिज तेल व पोलाद ह्यांच्या गरजा भागविण्यासाठी सर्वस्वी रशिआवर अवलंबून आहे. अर्थातच आर्थिक विकासाच्या इतर वाटा त्याला बंद झाल्या आहेत.

**ग्रेट ब्रिटनमधील शिखांची मागणी** — ग्रेट ब्रिटनमधील कित्येक स्थानिक स्वराज्य संस्था दाढी आणि पागोटेवाल्या शिखांना नोकरीवर ठेवीत नाहीत. त्याविरुद्ध लढा करण्याच्या कामी तेथील शीख पुढाऱ्यांनी सरकारचा पाठिंबा मागितला आहे. ग्रेट ब्रिटनमध्ये १,२५,००० शिखांची वस्ती आहे.

**अध्यक्षाच्या निवडणुकीवर ३७.५ कोटी रु. खर्च**— येत्या नोव्हेंबरमध्ये अमेरिकेच्या अध्यक्षाची निवडणूक होणार आहे. निवडणुकीस उभे असलेल्यांचा प्रचारखर्च सुमारे ३७.५ कोटी रुपयांवर जाईल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

**टेलिफोन डिरेक्टरीत किताब नकोत**—टेलिफोन डिरेक्टरीत नावाच्या मागे-पुढे किताब छापण्याचे ह्यापुढे बंद करण्यात येईल. ब्रिटिश राजवटीने दिलेले किताब वापरणे राज्यघटनेच्या विरुद्ध आहे. सर, रावबहादुर, खानबहादुर, सी. आय. ई., इत्यादींना त्यामुळे आपल्या ह्या जुन्या प्रतिष्ठेस डिरेक्टरीत मुकावे लागेल.

**वाफेच्या इंजनाचा अखेरचा रामराम**—ग्रेट ब्रिटनमधील आगगाडीच्या वाफेच्या इंजनाने आपला अखेरचा प्रवास ११ ऑगस्ट रोजी केला. १३८ वर्षांपूर्वी ह्या इंजिनांनी आगगाड्या ओढण्यास प्रारंभ केला होता. ह्या अखेरच्या प्रवासाचे वेळी आगगाडीत बसण्यासाठी ४०० उतारूंनी प्रत्येकी सुमारे ५०० रुपये देऊन आपली हौस भागवून घेतली.

**चार्लस प्रिन्स ऑफ वेल्स होणार**—पुढील वर्षी राणी एलिझाबेथ आपल्या १९ वर्षाच्या पुत्रास प्रिन्स ऑफ वेल्स पदाची दीक्षा देईल. तो समारंभ जगांतील सुमारे ४० कोटी लोकांना पाहावयास मिळेल. ह्या समारंभाला ५० लक्ष रुपये खर्च येईल, पण त्यानिमित्त उत्तर वेल्समध्ये येणाऱ्या बघ्यांपासून वेल्सला चांगली प्राप्ती होईल.

**अयूबच्या आत्मचरित्राचे जपानी भाषांतर**—पाकिस्तानी प्रेसिडेंट अयूबच्या राजकीय आत्मचरित्राचे जपानी भाषांतर प्रसिद्ध झाले आहे.

**"दो या तीन बच्चे बस"**—अशा पत्र्याच्या पाट्या आगगाड्यांच्या डब्यांतून लावून, लहान सुखी कुटुंब चित्रित करण्याचा आणि कुटुंबनियोजनाचा प्रचार करण्यात येणार आहे.

**राजस्तानात टोळधाड**—पाकिस्तानांतील सिंध भागातून राजस्तानात टोळांचे मोठे थवे येऊ लागले आहेत. बारमेर जिल्ह्यात टोळांची एक प्रचंड धाड आली आहे. ह्या धाडीची व्याप्ती ३४ चौरस किलोमीटर इतकी मोठी होती. राजस्तानप्रमाणे गुजरातमध्येही टोळधाड येण्याची शक्यता आहे. परंतु टोळांचा बंदोबस्त करण्याचे काम आत्मविश्वासाने करण्यात येत आहे.

---

☆ अर्थ ☆

बुधवार, सप्टेंबर १८, १९६८



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

### राष्ट्रीय उत्पन्नाचा पाया अखेर शेतीवर अवलंबून

मध्यवर्ती आकडेविषयक संघटनेने गेल्या तीन वर्षांतील राष्ट्रीय उत्पन्नासंबंधीची आकडेवार माहिती प्रसिद्ध केली आहे. त्या माहितीवरून हिंदचे राष्ट्रीय उत्पन्न शेतीच्या व्यवसायातील चढउतारावर कसे अवलंबून आहे, ते चांगले लक्षात येते. १९६०–६१ सालातील किंमती लक्षात घेतल्या तर १९६४–६५ सालातील राष्ट्रीय उत्पन्न १६,१७६ कोटी रुपयांचे होते. त्याच किंमती आधारभूत घेऊन १९६५–६६ सालातील राष्ट्रीय उत्पन्न १५,११९ कोटी रुपयांपर्यंत खाली आल्याचे आढळून येते. १९६६–६७ साली ह्या उत्पन्नात थोडी वाढ होऊन ते १५,२७२ कोटी रुपयांचे झाले. १९६७–६८ सालात हे उत्पन्न जरा अधिक वेगाने वाढून १६,६६५ कोटींपर्यंत आले. हा अंदाज उपलब्ध असलेल्या माहितीवरून करण्यात आला आहे. तो थोडाबहुत इकडेतिकडे होण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय उत्पन्नात झालेले हे चढउतार दरडोई उत्पन्नात प्रतिबिंबित झालेले आहेत. १९६५–६६ सालात दरडोई उत्पन्नात ८·८ टक्यांनी घट झालेली दिसते आणि १९६६–६७ सालात ते १·४ टक्यांनी आणखी खाली आले. ही बाब चिंतनीयच म्हणावी लागेल. १९६७–६८ सालात दरडोई उत्पन्नात ६·५ टक्यांनी वाढ झाली. परंतु येथे हे लक्षात घेतले पाहिजे की ही वाढ मागील वर्षांच्या घटीनंतर झालेली आहे. ह्या आकडेवारीचा अर्थ असा की, राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात सततः वाढ होण्यासाठी अर्थव्यवस्थेच्या शेतीच्या विभागात सतत प्रगती झाली पाहिजे. गेल्या वर्षी शेतीच्या उत्पादनात क्रांतिकारी वाढ झाल्याचे सांगण्यात येते. परंतु एखाद्या-दुसऱ्या वर्षी झालेली ही प्रगती खुंटण्याचा संभव नजरेआड करून चालणार नाही. कारण हिंदी शेती अद्याप पावसाच्या कृपेवरच विसंबलेली आहे.

---

### व्यापारी पिकांची निर्यात वाढविण्याचा इरादा

चौथ्या पंचवार्षिक योजनेत व्यापारी पिकांची निर्यात ५० टक्क्यांनी वाढविण्याचा भारत सरकारचा इरादा आहे. सरकारच्या शेतकी खात्याच्या जॉईंट कमिशनरनी ही माहिती देताना सांगितले की, 'व्यापारी पिके कच्च्या स्वरूपात निर्यात करण्यात येतील. ह्या पिकात मुख्यतः ताग व तागापासून बनविलेला माल, कापूस आणि कापसापासून बनविलेला माल, काजूगर, मसाल्याची धान्ये, कृषिउद्योगधंद्यात तयार करण्यात येणारी साखर, कागद, लाख, इत्यादी मालाचा समावेश होतो. १९६७–६८ सालात ह्या मालाच्या निर्यातीने भारताला ४९५ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळाले. भारतापासून हा माल घेणाऱ्या देशांत अमेरिका, ब्रिटन, युरोपियन देश, पश्चिम आशिया, जपान, इत्यादी देशांचा समावेश आहे. व्यापारी पिकांचा विकास घडवून आणण्यासाठी कृषिउद्योगधंद्याची वाढ झाली पाहिजे. हे काम एकट्या सरकारच्या हातून होण्यासारखे नाही. त्यासाठी उद्योगपतींचे सहकार्य मिळविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. मध्यवर्ती सरकारने नगदी उत्पन्न देणाऱ्या व्यापारी पिकांच्या उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी २·५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ह्या रकमेतून राज्य सरकारांना मदत देण्यात येणार आहे. शेतीचा माल निर्यात करता यावा म्हणून शेतीच्या व्यवसायाची दिशा बदलण्याचा प्रयत्न करण्यात आला पाहिजे. त्या दृष्टीने खतांचे कारखानदार, कीडनाशक औषधे तयार करणारे कारखानदार, इत्यादींनी सरकारी प्रयत्नांशी सहकार्य देण्याची तयारी दाखविली पाहिजे. मध्यवर्ती व राज्य सरकारांनी ह्या दिशेने जे प्रयत्न करण्याचे ठरविले आहे त्यात सक्रिय सहभागी होण्याचे काही उद्योगपतींनी मान्य केले आहे.

---

### डॉ. गाडगीळ रशिआला जाणार

नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. धनंजयराव गाडगीळ चालू महिनाअखेर रशिआला जाणार आहेत. त्या वेळी उभयता देशांतील आर्थिक हितसंबंधाची ते चर्चा करतील. दौऱ्याविषयी बोलताना ते म्हणाले की, रशिआ भारताकडून जर रेल्वेचे मालवाहू डबे घेणार असेल तर नियोजन मंडळ मागिर्णींच्या उत्पादनाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी जरूर ती व्यवस्था करील. रशिआ हा भारताकडून माल विकत घेणारा एक मोठा देश आहे, म्हणून रशिआला भेट देण्याचे ठरविण्यात आले. तथापि, रशिआच्या आर्थिक नियोजनाशी भारताच्या नियोजनाची पक्की सांगड घालण्यास भारत बांधलेला आहे असा मात्र त्याचा अर्थ नाही. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमात शहरांच्या विकासाच्या योजना, आणि तेथील पाणीपुरवठ्याचे व राहत्या घरांचे प्रश्न ह्या बाबीकडे खास लक्ष पुरविण्यात येणार आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली.

### किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि.

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि. ला ३१ मार्च, १९६८ अखेर संपलेल्या वर्षी सर्व खर्च, घसारा, मॅनेजिंग एजंटांचा मेहनताना, कामगारांना बोनस, ही सर्व वजा जाता २,५१,७०,३८९ रु. नफा उरला. गेल्या वर्षी कंपनीने २५ लक्ष रुपयांनी आपले वसूल भांडवल वाढविले, तरीही तिने इक्विटी भागावर १६% आणि प्रेफरन्स भागावर १०% डिव्हिडंड कायम राखले आहे.

### सेकंडहँड शास्त्रीय ज्ञान नको

"स्वतंत्र शास्त्रीय संशोधन करू शकणारे बुद्धिमान लोक भारतात भरपूर आहेत, परंतु स्वस्त विदेशी प्रकाशनांच्या भरमसाठ आयातीमुळे, त्या सेकंडहँड ज्ञानाने, आपल्या लोकांची इर्षा मारली जात आहे. शिक्षण कसे द्यावे, हे शिकविण्यासाठी अमेरिकनांना येथे पाचारणे हास्यास्पद आहे."

—डॉ. सी. व्ही. रामन्

### भारत चहाच्या उत्पादनात पहिला

चहाच्या उत्पादनात सर्व जगात भारताचा पहिला क्रमांक आहे; कॉफीच्या उत्पादनात तिसरा, कपाशीच्या उत्पादनात ४२ वा, तंबाखूच्या उत्पादनात ४६ वा आणि गव्हाच्या उत्पादनात ४८ वा क्रमांक आहे.

### सुएझ कालव्याच्या बंदीमुळे भुर्दंड

सुएझ कालवा बंद झाल्यामुळे भारताला आयात मालाच्या वाहतुकीप्रीत्यर्थ दरमहा २·२५ कोटी रु. जास्त खर्च सोसावा लागतो. निर्गत मालाप्रीत्यर्थ पडणारा भुर्दंड वेगळाच.

### आपण दररोज ३०,००० शब्द बोलतो

दररोज आपण सुमारे १६ तास जागे असलो तर सुमारे ३ तास, २० मिनिटे बोलतो. दर मिनिटाला १५० शब्द ह्या हिशेबाने तासात ९,००० शब्द बोलले जातात. म्हणजे, आपल्या बोलण्यात दररोज सुमारे ३०,००० शब्द येतात. काहीजण, अर्थातच, ह्यापेक्षा कितीतरी जास्त बोलतात. रशियन तज्ज्ञांच्या पाहणीचा हा निष्कर्ष आहे.

### ऑस्ट्रेलियन संघाने ८·४० लक्ष रु. नफा मिळविला

आस्ट्रेलियाच्या क्रिकेट संघाने इंग्लंडचा दौरा केला, त्यापासून ८·४० लक्ष रुपये संघाने नफा मिळविला. प्रारंभी प्रतिकूल हवेमुळे आर्थिक काळजी वाटत होती, पण शेवटी शेवटी आधीची तूट भरून निघाली आणि भरघोस नफा उरला.

### फासावर जाण्यापूर्वी नेत्रदान

हनुमय्या ह्या कैद्याला सिकंदराबाद येथे फाशी देण्यात आले. फासावर जाण्यापूर्वी त्याने आपल्या एका डोळ्याचे दान केले (त्याला एकच डोळा होता). त्यामुळे एका अंधाला दृष्टी प्राप्त झाली आहे.

### संततिप्रतिबंधक गोळ्यांचा परिणाम

संततिप्रतिबंधक गोळ्या घेणाऱ्या स्त्रियांत डोके दुखण्याचे प्रमाण जास्त आढळते, त्यांची लैंगिक भूक मंदावते आणि मुलांच्यासंबंधी वात्सल्यभावना कमी होते, असा एक नामवंत इटालियन शास्त्रज्ञाचा निष्कर्ष आहे.



## हिंसक गुन्ह्यांची अमेरिकेत झालेली वाढ

अमेरिकेच्या मध्यवर्ती गुप्त पोलिस खात्याने आपला वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात ग्रथित करण्यात आलेल्या माहितीवरून अमेरिकेत हिंसक गुन्ह्यांची वाढ होत असलेली दिसून येते. गेल्या वर्षी अमेरिकेतील गंभीर व हिंसक गुन्ह्यांत १६.५ टक्क्यांनी वाढ झाली. त्यांची एकूण संख्या ३८ लाख इतकी मोठी आह. प्रत्येक १०० अमेरिकन नागरिकांमागे दोन नागरिक अशा गुन्ह्यांचे भक्ष्य होण्याच्या धोक्यात वावरत असतात. १ लाख नागरिकामागे १९२२ गंभीर गुन्हे होत असतात. त्यात जबरी चोरी, खून व इतर हिंसक गुन्ह्यांचा समावेश आहे. खुनांची संख्या २५० च्या जवळपास असल्याचे आढळून आले. गेल्या वर्षी प्रत्येक मिनिटाला ७ गंभीर प्रकारचे गुन्हे झाले व एक हिंसक गुन्हा झाला. त्यात खून, बलात्कार आणि प्राणघातक हल्ले ह्यांचा समावेश आहे. १९६० सालापासून गुन्ह्यांच्या संख्येत ८९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. लोकसंख्येची वाढ मात्र १० टक्क्यांनीच झाली आहे. १९६७ साली अमेरिकेत १२ हजार खून करण्यात आले. १९६६ सालाशी तुलना करता हा आकडा १,१५० ने जास्त आहे. गेल्या दहा वर्षांत झालेल्या गुन्ह्यांच्या वाढीत हा उच्चांक आहे. खुनाच्या गुन्ह्यांपैकी ४८ टक्के गुन्हे अमेरिकेतील दक्षिणेकडील संस्थानांतून झाले. अमेरिकेतील नागरिकांना शस्त्रे बाळगण्याचा हक्क घटनेनेच दिलेला आहे. त्यामुळे तो हक्क काढून घेणे अवघड किंबहुना अशक्यच आहे. घातक हत्यारांची नोंदणीही करण्यात येत नाही. त्यामुळे हत्यारे सहजगत्या मिळू शकतात. अलीकडे प्रे. जॉन्सन ह्यांनी हत्यारांच्या खरेदीवर नियंत्रणे घालणारा कायदा करण्याचा प्रयत्न केला. पण कायद्यातील तुटपुंज्या व अपुऱ्या बंधनांनाही विरोध होत आहे. परिणामी हिंसाचारावर आळा घालणे अवघड झाले आहे.

---

## ग्रामीण भागांतील बँकांच्या शाखा

बँकांतील ठेवीसंबंधी रिझर्व्ह बँकेने अलीकडे एक पाहणी केली होती. तीवरून असे दिसून येते की, व्यापारी बँकांनी ग्रामीण भागात उघडलेल्या शाखा आतबट्ट्याच्याच होणार, ही समजूत चुकीची आहे. बँकांमधील ठेवी शहरी अगर निमशहरी भागांतूनच वाढतात असा समज आहे. परंतु व्यापारी बँकांच्या ग्रामीण शाखांतील ठेवी त्यापेक्षाही अधिक वेगाने वाढत आहेत असे आढळून आले आहे. ज्या प्रदेशात अन्नधान्याचे उत्पादन वाढले आहे तेथील शाखांतून तर ही प्रवृत्ती विशेष दिसून येते. ग्रामीण भागातील शाखा आर्थिक अगर सामाजिक सेवेच्या भावनेने काढण्यात येतात अगर याव्या असा ग्रह रूढ झाला आहे. परंतु आता तो बदलण्याची वेळ आली आहे. दक्षिण पंजाबातील शेतकरी बँकांच्या मार्फत आपले व्यवहार अधिक प्रमाणात करू लागला आहे. इतरत्रही हीच प्रवृत्ती रुजण्याची शक्यता दिसत आहे.

## हिंदुस्थान मशीन टूल्सची निर्यात

हिंदुस्थान मशीन टूल्स हा कारखाना चालू वर्षी एक कोटी रुपये किंमतीची यांत्रिक हत्यारे निर्यात करण्याची अपेक्षा बाळगून आहे. कारखान्याचे अध्यक्ष श्री. एस्. एम्. पाटील अलीकडेच ब्रिटन, अमेरिका आणि युरोप ह्यांचा दौरा करून आले. कारखान्याच्या मालाला वरील देशांत कितपत वाव आहे ह्याची पाहणी करण्यासाठी ते तिकडे गेले होते. सहा आठवड्यांच्या आपल्या दौऱ्यात त्यांनी मालाचे वितरण करण्याची व्यवस्था केली. येत्या काही वर्षांत कारखान्याच्या मालाची निर्यात २ कोटी रुपयांच्या घरात जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्याच्या अडचणी अद्याप पूर्णपणे संपलेल्या नाहीत, असेही त्यांनी सांगितले.

---

## गोंदिआ येथे योगावर आधारलेली शाळा

गोंदिआ येथे योगशास्त्राचे धडे देणारी एक शाळा स्थापन करण्यात आली आहे. ह्या शाळेत इतर नेहमीच्या विषयाबरोबर योगशास्त्राचे धडे शिकविण्यावर विशेष भर देण्यात येईल. विद्यार्थ्यांना स्वयंनिर्मित शिस्त लावण्यात येईल आणि ध्यानाचेही शिक्षण देण्यात येईल. ४ ते १५ वर्षे वयाच्या विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांची संख्या प्रारंभी ३० ठेवण्यात येणार असून नंतर ती ६० पर्यंत वाढविण्यात येईल. शाळा ५० एकर जागेवर उभारण्यात आली आहे. त्यात शिक्षणाच्या सर्व सोयी आहेत. शिक्षकांच्या राहण्याची व्यवस्थाही तेथेच करण्यात आली आहे. शाळेच्या आवारातच भाजीपाला व फळे ह्यांची लागवड करून स्वयंपूर्णता आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला दरसाल १,९०० रुपये खर्च येईल.

---

## राज्य सरकारांनी परत करण्याची कर्जे

भारत सरकारने राज्य सरकारांना दिलेली कित्येक कर्जे आता परतफेडीच्या कक्षेत आली आहेत. चालू आर्थिक वर्षाच्या प्रारंभी एकट्या उत्तर प्रदेशाकडूनच ५९४.१५ कोटी रुपयांची कर्जाऊ रक्कम येणे होती. त्यानंतर बिहारचा अनुक्रम लागतो. बिहारकडून ५१९.१८ कोटी रुपये येणे आहे. आंध्र प्रदेशाकडून ४९१.४३ कोटी आणि पश्चिम बंगालकडून ४७१.२३ कोटी रुपये येणे होते. इतर काही राज्यांची देणी अशी : महाराष्ट्र ३७४.७३ कोटी, मध्यप्रदेश ३७५.५५ कोटी, राजस्थान ३६४.७८ कोटी, ओरिसा ३२२.६८ कोटी, मद्रास ३१७.११ कोटी, म्हैसूर २५८ कोटी, पंजाब २०८.७८ कोटी आणि गुजरात २०८.५७ कोटी.

## मिरच्यांच्या निर्यात व्यापारात स्पर्धा


मद्रास येथे मसाला निर्यात-वाढ मंडळाने मिरच्यांच्या निर्यात व्यापारासंबंधी एक परिसंवाद भरविला होता. ह्या परिसंवादात हिंदच्या एकूण अर्थव्यवस्थेत मिरच्यांच्या निर्यातीचे स्थान कोणते आहे ह्याविषयी विचार व्यक्त करण्यात आले. मिरच्या हा पदार्थ भारतात पोर्तुगीज व्यापाऱ्यांनी ३०० वर्षांपूर्वी आणला. त्यापूर्वी तिखटासाठी मिऱ्यांचा वापर करण्याची पद्धत होती. आता मात्र मिरच्यांनी हिंदवासीयांच्या आहारात महत्त्वाचे व कायमचे स्थान पटकावले आहे. हिंदमधील मिरच्यांचे वार्षिक उत्पादन सुमारे ५ लाख टन आहे. त्यांपैकी ९७ टक्के माल भारतातच खपतो, व अवघा ३ टक्के माल परदेशात निर्यात करण्यात येतो. तरीसुद्धा जगातील मिरच्यांच्या व्यापारात भारताचे स्थान पहिल्या क्रमांकाचे आहे. मिरच्या मुख्यतः सीलोन आणि अमेरिका ह्या देशांना निर्यात करण्यात येतात. मिरच्यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील ८० टक्के उलाढाल ह्या देशांकडून करण्यात येते. अलीकडे चीन आणि पाकिस्तान हे दोन देश आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उतरले असून भारताशी स्पर्धा करू लागले आहेत. सीलोनला निर्यात करण्यात येणाऱ्या मिरच्यांच्या व्यापारात त्यांनी बरीच चढाओढ चालविली आहे. अमेरिकेमध्ये जपानकडून आयात केलेल्या मिरच्या बऱ्याच लोकप्रिय झालेल्या आहेत. कसोशीने प्रयत्न केल्यास भारताच्या मिरच्या अमेरिकेत अधिक प्रमाणात खपू शकतील असा अंदाज करण्यात आला आहे. हिंदच्या मिरच्या जपानमधील मालापेक्षा अधिक रुचकर आणि स्वस्तही आहेत. पश्चिम आशियातील देशांत इथिओपिआत पिकणारी गडद लाल रंगाची व मोठ्या आकाराची मिरची लोकांना पसंत पडलेली आहे. अशा प्रकारच्या मिरच्या भारतात पिकविता आल्या तर हीही बाजारपेठ उपलब्ध होण्यासारखी आहे. वनस्पतिशास्त्रज्ञांनी संशोधन करावे अशी ही बाब आहे.

---

## अन्नविषयक परिस्थिती आशादायक ?

अमेरिकन सरकारने अन्न पुरविण्याच्या आपल्या कार्यक्रमाचा अहवाल प्रसिद्ध केला आहे, त्यावरून जगातील अन्नाच्या पुरवठ्याची परिस्थिती आशादायक वाटत आहे. जगांतील दाट लोकवस्तीच्या बहुतेक देशांतून अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झालेली आहे. ह्या देशांत भारत, पाकिस्तान व ब्राझिल ह्या देशांचा समावेश आहे. पण, त्याचबरोबर विकसनशील देशांतील लोकसंख्या वाढल्याने अन्नाची मागणीही वाढलेली आहे. लोकसंख्येची वाढ कमी होत चाललेली नाही. सर्वच विकसनशील देशांतून अन्नधान्याच्या वाहतुकीचा प्रश्न अवघड झालेला आहे. त्याचप्रमाणे हवामानाच्या अनिश्चितपणाचा शापही कायमचाच आहे. अमेरिकेने " स्वातंत्र्यासाठी अन्न देण्याचा कार्यक्रम " १९५४ साली चालू केलेला आहे.


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
" विजय " नांगर
वापरा.
४, ६ व ८ बेली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )



तारेचा पत्ता " मॉर्गेज " मुख्य कार्यालय दूरध्वनी क्र. २६१४९७ उपकार्यालय दूरध्वनी क्र. २५६५२७

**मुंबई राज्य सहकारी भू-तारण बँक लि., मुंबई**

जे. के. बिल्डिंग, ९ रा माळा, डुगल रोड,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑइल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्जवाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६७ अखेर बँकेने वाटलेल्या कर्जापोटी रु. ५६ कोटी येणे आहेत.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले — व्यवस्थापक

ये. स. बोरगांवकर — कार्यकारी संचालक

### विसंगत आर्थिक धोरणांचे परिणाम

कॅनडामधील मॉन्ट्रील येथे इंटरनॅशनल इकॉनॉमिक असोसिएशनची परिषद भरविण्यात आली होती. परिषदेसाठी जगातील निरनिराळ्या देशांचे ६०० अर्थशास्त्रज्ञ जमले होते. परिषदेत बोलताना स्वीडनचे एक प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ म्हणाले की, आजच्या जगातील आंतरराष्ट्रीय व्यापारात आणि देण्याघेण्यात विलक्षण ताण उत्पन्न झालेला दिसून येतो. निरनिराळ्या देशांची सरकारे देशांतर्गत एक आणि देशांबाहेरील व्यवहारात दुसरेच विसंगत धोरण स्वीकारतात. त्यामुळेच हा ताण बव्हंशी निर्माण झालेला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात लवचीक व उदार पद्धतीने व्यवहार करण्याची वाढती प्रवृत्ती दिसून येत आहे. पण, त्याचबरोबर देशांतर्गत व्यवहारावर हेतुपूर्वक आणि महत्त्वाकांक्षी नियंत्रणे ठेवून ती कडकपणे राबविण्याची प्रवृत्तीही सरकारी पातळीवर दिसून येते.

### वर्गात बसलेल्या अमेरिकन विद्यार्थ्यांचे अंतर्मन

अमेरिकेतील एका मानसशास्त्रज्ञाने अमेरिकेतील कॉलेजांतून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अंतर्मनात डोकावून पाहण्याची एक अभिनव युक्ती योजिली. ह्या प्रयोगासाठी ८५ कॉलेज विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. हे विद्यार्थी मानसशास्त्राचेच अभ्यासक होते. अभ्यासक्रम चालू असता एके दिवशी वर्गात व्याख्यान चालू असतानाच पिस्तुलाचा एक बार काढण्यात आला. नेमके त्या वेळी आपल्या डोक्यात काय विचार चालू होते ह्याचा झाडा विद्यार्थ्यांनी द्यावयाचा होता. तसा तो त्यांनी दिला. तेव्हा असे आढळून आले की, वर्गात प्राध्यापकाचे व्याख्यान ऐकत असता २० टक्के स्त्री-पुरुष विद्यार्थ्यांच्या अंतर्मनात कामविषयक विचार घोळत होते. फक्त २० टक्के विद्यार्थ्यांचेच वर्गात लक्ष होते. बाकीच्यांच्या मनात आणखी निरनिराळे विचार चालू होते.

### विकासाच्या कामासाठी सोडतीतून पैसा

पंजाब राज्याने विकासाच्या कामासाठी सरकारी सोडतीचा उपक्रम केला होता. ह्या सोडतीत पहिल्यांदा चिठ्ठ्या टाकण्यात आल्या, तेव्हा राज्याला १६ लाख रुपयांचे उत्पन्न झाल्याचे आढळून आले. ही रकम चालू आर्थिक वर्षात विकासाच्या कामावर खर्च करण्यात येणार आहे. पंजाब राज्यात सोडतीच्या मार्गाने पैसा गोळा करण्याची ही पहिलीच वेळ आहे. पंजाब सरकारच्या अधिकाऱ्याने ह्यासंबंधी बोलताना असे सांगितले की लोकांना जादा कर देणे आवडत नाही आणि राज्य सरकारला तर नवनवीन कामे हाती घेण्यासाठी अधिकाधिक पैसा लागत असतो. अशा परिस्थितीत लोकांच्याजवळून पैसा गोळा करण्याचा हा मार्ग सरकारला चोखाळावा लागला. नेहमीच्या मार्गाने मिळणारा पैसा अपुरा पडल्यामुळे दुसरे मार्ग शोधणे अपरिहार्यच आहे.

### लाखेच्या व्यापारात होणारी प्राप्ती

लाख निर्यात मंडळाची दहावी वार्षिक सभा कलकत्ता येथे भरविण्यात आली होती. ह्या प्रसंगी बोलताना मंडळाचे अध्यक्ष म्हणाले की, १९६७–६८ सालात भारतामधून १५ हजार, ३९० टन लाख निर्यात करण्यात आली व त्यापासून ५.१५ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ती झाली. गेल्या वर्षापेक्षा ही प्राप्ती थोडी अधिक आहे. हिंदच्या लाखेची किंमत इतर देशांच्या मानाने कमी होती. थायलँड हा लाख निर्यात करणारा मोठा देश आहे. तेथील उत्पादन जवळजवळ थांबलेलेच होते. तरीसुद्धा अमेरिकेकडून जितकी मागणी येईल अशी अपेक्षा होती तितकी आली नाही. लाखेची निर्यात करण्यासाठी ज्या नियमांचे व विधींचे पालन करावे लागते त्यात फार काळ जातो. सरकारने ही दिरंगाई कमी करावी अशी मंडळाची मागणी आहे.

### डॉ. धनंजयराव गाडगीळ रशियाला जाणार

नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष, डॉ. धनंजयराव गाडगीळ, ह्यांचा नेतृत्वाखाली पाच जणांचे एक मंडळ चवथ्या पंचवार्षिक योजनेला रशियाची मदत मिळविण्यासाठी बोलणी करण्याकरिता मॉस्कोला जाण्यास दि. २२ रोजी निघणार आहे.

### जपानची प्रचंड औद्योगिक प्रगति

जपानचे औद्योगिक उत्पादन कमालीच्या वेगाने वाढत आहे. चालू वर्षी ते ९% वाढेल असा प्रारंभी अंदाज होता; प्रत्यक्ष वाढ १५% होईल. परदेशांकडून प्रचंड प्रमाणावर ऑर्डरी येत आहेत त्याचा हा सुपरिणाम आहे. जपान आता एकूण उत्पादनाच्या बाबतीत जर्मनीलाही मागे सारील. एकूण उत्पादनाचे बाबतीत जपानचा अमेरिकेचे खालोखाल दुसरा अनुक्रम असला, तरी, दर माणशी उत्पन्नात जपानचा २० वा अनुक्रम लागतो.

### स्कूटर्सच्या नव्या कारखान्याला लायसेन्स

दरसाल ६५,००० स्कूटर्स तयार करणाऱ्या एका कारखान्याला मध्यवर्ती सरकार लायसेन्स देणार आहे. सध्या स्कूटर्स करणारे ८ कारखाने असून त्यांची उत्पादनक्षमता १,६०,००० स्कूटर्सची आहे. स्कूटर्सना मागणी वाढत असून १९७३–७४ च्या सुमारास २,२५,००० स्कूटर्सच्या उत्पादनक्षमतेची गरज भासू लागेल.

### उत्कृष्ट आरोग्याची तीन पथ्ये

" माझ्या चांगल्या प्रकृतीचे कारण, डॉ. बिधनचंद्र रॉय ह्यांचे प्रिस्क्रिप्शन मी तंतोतंत अनुसरतो : दुसऱ्यांच्या घरी कधीही खाऊ नका, रोजच्या व्यायामात खाडा करू नका आणि शक्य तेवढी गाढ झोप घ्या. "

—डॉ. सी. व्ही. रामन

## पोपचे फर्मान दरिद्री देशांतील अशिक्षित कॅथॉलिकांची संख्या वाढविणार !

### अंध धर्मनिष्ठा श्रेष्ठ, की देशनिष्ठा श्रेष्ठ ?

"भारतासारख्या विकसनशील देशावर पोप महाशयांनी अपकारच केला आहे. आपल्या चर्चशी निष्ठा राखायची का आपल्या देशाशी, असा प्रश्न निर्माण झाल्यावर कॅथॉलिक लोक अखेर पोपचीच आज्ञा पाळतील. राष्ट्रीय प्रगती आणि विकास ह्यासाठी भारताने कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम आखला आहे, आणि हिंदी कॅथॉलिक लोक पोपच्या म्हणण्याप्रमाणे वागतील, तर तो देशद्रोह होईल. हिंदी कॅथॉलिक आधी हिंदी असावा आणि मगच कॅथॉलिक असावा, का तो आधी कॅथॉलिक आणि मग हिंदी असावा, हा महत्त्वाचा प्रश्न येथे उपस्थित होतो. कॅथॉलिक चर्चचा निर्णय किमान ४०० वर्षांनी जुनापुराणा आहे. कुटुंबनियोजन प्रभूच्या इच्छेविरुद्ध आणि म्हणून अनैसर्गिक आहे, ह्यासाठी त्याला चर्चचा विरोध असेल, तर कॅथॉलिक धर्मोपदेशकांनी सक्तीने ब्रह्मचर्य पाळणे नैसर्गिक आणि प्रभूच्या इच्छेप्रमाणेच आहे काय ?"

—डॉ. सी. पॉल वर्घिस

"कुटुंबनियोजनाविरुद्ध पोप महाशयांनी काढलेल्या फतव्याचे विरुद्ध कॅथॉलिक ख्रिस्ती दांपत्यांनी आवाज उठवण्याची वेळ आली आहे. पाश्चात्य श्रीमंत देशांना चालू शकणारा हा फतवा आपल्या भारतासारख्या दरिद्री देशात हितकारक होणे अशक्य आहे. भरमसाठ अपत्य संख्या, मुलाबाळांना शिक्षण, वस्त्र आणि औषधपाणी देणे न परवडण्यासारखी आर्थिक दुःस्थिती, अशा ठिकाणी हा फतवा चुकीचा ठरतो. आम्हा कॅथॉलिक लोकांना मुभा मिळाली तर बहुसंख्य कॅथॉलिक लोक कुटुंबनियोजनाचाच पुरस्कार करतील."

—मिसेस जोन परेरा

"कुटुंब नियोजनासंबंधी कॅथॉलिक लोक पोप महाशयांच्या फर्मानाबद्दल आणि कुटुंबनियोजनाबद्दल बाहेर काहीही बोलोत, कुटुंबाचा आकार मर्यादित राखण्यासाठी कित्येक वर्षे प्रगत देशांती लर्कॅथॉलिकसकट सर्व नागरिक कृत्रिम साधने वापरीत आहेत, हे अगदी उघड आहे. ऑस्ट्रिया, जर्मनीचे कॅथॉलिक विभाग, इतकेच नव्हे तर उत्तर इटलीचा प्रगत विभाग, येथील जननाचे प्रमाण प्रॉटेस्टंट देशांतील जननाच्या प्रमाणापेक्षा जास्त आढळत नाही. कित्येक शतकांपूर्वी काहीतरी सांगितल्याप्रमाणे आणि आता पोपनी काढलेल्या फर्मानाप्रमाणे आजही लैंगिक आणि कौटुंबिक जीवन जगले पाहिजे, असा शैक्षणिक-दृष्ट्या मागासलेले फक्त कॅथॉलिक लोकच अविचार करतात."

—दि. धों. कर्वे

### मालाच्या द्रुत गतीने वाहतुकीला बँकांचे साहाय्य

रेल्वेजनी सुपर एक्सप्रेस आणि कंटेनर गाड्या सुरू केल्या आहेत. ह्या जलद जाणाऱ्या मालगाड्या जेथे माल पाठवावयाचा, तेथे मालाच्या रेल्वे रिसिटांच्या पुष्कळच आधी पोचतात. त्यामुळे कित्येक महत्त्वाच्या स्टेशनांवर माल साठून पडतो; व्यापाऱ्यांना रेल्वे रिसिटांच्या अभावी मालाची डिलिव्हरी घेता येत नाही. रेल्वे खात्याने शेड्यूल्ड बँका व रिझर्व्ह बँक ह्यांच्याशी वाटाघाटी करून ही अडचण दूर करण्याची योजना आखली आहे. ह्या योजनेप्रमाणे, शेड्यूल्ड बँक तारेने 'डिलिव्हरी ट्रॅन्स्फर ऑर्डर' आपल्या शाखेला पाठविते; त्यांत कनसाइनमेंट नंबर व इतर तपशील देण्यात येतो. ही ऑर्डर त्या ठिकाणच्या रेल्वे अधिकाऱ्यांकडे दाखल करून व्यापारी आपल्या मालाची डिलिव्हरी घेऊ शकतो; पोस्टाने धाडण्यात आलेली रेल्वे रिसीट मिळण्याची वाट पाहावी लागत नाही. रिझर्व्ह बँकेने ह्या व्यवस्थेस मान्यता दिली आहे. आणखी १० रेल्वे मार्गांवर कंटेनर सर्व्हिस सुरू करण्याचे वेळापत्रक रेल्वे खात्याने आखले असून येत्या अठरा महिन्यात त्याची अंमलबजावणी पुरी होईल.

### विमानातून प्रवास अधिक सुरक्षित झाला

गेल्या पाच वर्षांत विमानातून प्रवास खूपच सुरक्षित झाला. विशेषतः १९६७ मध्ये अपघात पुष्कळच कमी झाले, असा जागतिक अनुभव आहे. १९६७ मध्ये अपघाती मृत्यूंची संख्या ९२६ वरून ६७४ वर आली. उतारूंची संख्या २०% वाढली. म्हणजे, उतारूंना अपघाती मरण येण्याचे १० कोटी उतारू × किलोमीटर प्रवास ह्या संख्येशी प्रमाण ०·४ वरून ०·२५ वर उतरले; म्हणजे ते ३७% खाली आले. जेट एंजिनांच्या वापराचा हा सुपरिणाम आहे.

### कच्छच्या वाळवंटाचा विस्तार

कच्छच्या वालुकामय रेताड जमिनीचा दक्षिणेकडे विस्तार होत असल्याची माहिती गुजरात राज्याच्या जंगल खात्याच्या मंत्र्यांनी दिली आहे. उत्तर गुजरातवर रणाचे आक्रमण दरसाल सुमारे १ चौरस मैल इतके होत आहे. हा विस्तार थांबविण्यासाठी ठिकठिकाणी झाडे लावण्यात आली आहेत. सुमारे २८ हजार एकरांत वृक्षवृद्धीचा हा प्रयत्न करण्यात येत आहे.

### राहुरी कारखान्याच्या डिस्टिलरीचा कोनशिला समारंभ

राहुरी सहकारी साखर कारखान्याच्या डिस्टिलरीचा कोनशीला समारंभ नामदार बाळासाहेब देसाई, महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य, ह्यांच्या शुभहस्ते सोमवार, दि. १३।९।१९६८ रोजी कारखान्याचे कार्यस्थळावर झाला.

### तुपातील भेसळ थांबविण्याचे प्रयत्न

गेल्या काही वर्षात अन्नपदार्थात भेसळ करण्याचे प्रकार वाढलेले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आरोग्यखात्यांतर्फे असे प्रकार पकडून गुन्हेगारांना शिक्षा देण्याचे प्रयत्न करण्यात येतात. तरीपण भेसळीला संपूर्णपणे आळा घालण्यात अद्याप यश आलेले नाही. इतर अनेक पदार्थांबरोबरच वनस्पती तुपातही भेसळ करण्यात येते. भेसळीमुळे ते वापरणे अर्थातच धोक्याचे होते. वनस्पती तुपातील भेसळ ओळखता यावी म्हणून त्याला आरोग्याला हानिकारक नसणाऱ्या एखाद्या रंगाची छटा देता येईल काय, ह्याचा विचार करण्यासाठी मध्यवर्ती सरकारच्या अन्नखात्याने एक कमिटी नेमली होती. कमिटीने असा निष्कर्ष काढला आहे की, अशा तऱ्हेचा रंग वनस्पति तुपाला देणे इष्टही नाही आणि व्यवहार्यही नाही. ह्या कमिटीवर काही उद्योगपतींनी दडपण आणल्याची तक्रार लोकसभेत करण्यात आली होती. अन्नमंत्री श्री. जगजीवनराम ह्यांनी ती फेटाळली. शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधन मंडळानेही असाच अभिप्राय व्यक्त केला आहे. तुपाला आरोग्यास हानिकारक नसणारा रंग देण्यासाठी गेली बरीच वर्षे संशोधन करण्यात येत आहे. परंतु शास्त्रज्ञांना त्यात यश आलेले नाही. कोणत्याही प्रकारचा रंग वापरला तरी त्याने तुपात अनिष्ट प्रकारची भेसळ होते असे आढळून आले आहे. दुसरे असे की, हा प्रश्न फक्त भारतापुरताच मर्यादित असल्याने दुसऱ्या देशातील शास्त्रज्ञांना त्याबाबत आस्था वाटत नाही. तथापी, ह्या प्रश्नात पुन्हा नव्याने लक्ष घालून आणखी शास्त्रज्ञांचा सल्ला घेण्याचा सरकार विचार करीत आहे. दरम्यान भेसळीला पायबंद घालणारे इतर उपाय अमलात आणले गेले तरीसुद्धा हा प्रश्न सुटण्यास बरीच मदत होईल.

---

### रशियाच्या आक्रमणातील लष्करी कार्यक्षमता

गेल्या महिन्यात रशियन लष्कराने झेकोस्लोव्हाकिया हा चिमुकला देश हा हा म्हणता व्यापला. अवजड लष्करी सामानाची वाहतूक करण्याची कामगिरी अतिशय अवघड असते. पण रशियाच्या लष्कराने ती अत्यंत कार्यक्षम पद्धतीने पार पाडली. लष्करी कारवाईत वापरण्यात आलेले टी ५४ जातीचे रणगाडे विमानाने उतरविण्यात आले. रस्त्याने येण्यास त्यांना कितीतरी अवधी लागला असता. प्रचंड विमानांनी ३१ टन वजनाचे हे रणगाडे आणण्यात आले. प्रत्येक विमानात दोन रणगाडे होते. विमानांना उतरण्यास विमानतळ मिळाला नसता तर ही विमाने खुल्या जमिनीवरही उतरू शकली असती. पाश्चिमात्य देशांजवळील वाहतुकीचे मोठ्यात मोठे लष्करी विमान इतक्या वजनाचा एक रणगाडासुद्धा वाहू शकले नसते.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छेः ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

दि बेळगाव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्यानजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

### क्रिकेट संघातून वगळला, केशरचनेत निवडला

बेसिल डि ऑलिव्हिरा याला, दक्षिण आफ्रिकेत दौरा करणाऱ्या इंग्लंडच्या क्रिकेट संघात तो श्वेतवर्णीय नसल्यामुळे द. आफ्रिकेच्या विरोधापुढे हार खाऊन घेण्यात आले नाही, त्यामुळे त्या खेळाडूचा अन्य तऱ्हेने फायदा झाला आहे. सर्व वृत्तपत्रांतून आणि टेलिव्हिजनवरून त्याच्यावरील अन्यायाला भरपूर प्रसिद्धी मिळाली; इतकेच नव्हे तर त्याला ब्रिटनच्या कमर्शिअल टेलिव्हिजनवर क्रिकेट कॉमेंटेटर म्हणून नोकरी मिळाली आहे. नॅशनल हेअर ड्रेसर्स फेडरेशनच्या प. ब्रॉमिच शाखेने त्याची 'ब्रिटनमधील सर्वोत्कृष्ट केशरचना असणारा' म्हणून निवड केली आहे.

### कुशल तंत्रज्ञांची शारीरिक श्रमाची तयारी

काही दिवसांपूर्वी रशियन लष्कराने झेकोस्लोव्हाकियात अचानक घुसून त्या देशाचा ताबा घेतल्यावर झेक देशातील अनेक कुशल तंत्रज्ञ शेजारच्या ऑस्ट्रिया देशात पळून गेले. झेकोस्लोव्हाकियात परत जाण्याचे त्यांनी नाकारले आणि कौशल्याचे काम न मिळाले तरी ऑस्ट्रिआतच राहून वेळप्रसंगी शारीरिक कष्ट करण्याचीही तयारी दाखविली. ऑस्ट्रिआंतील कारखानदारांना त्यांचे काम पसंत पडले व सरकारने त्यांना ऑस्ट्रिआत राहण्याचे हंगामी परवाने दिले. दिवसगत होत आहे तसतशी या परागंदा झेक कामगारांची संख्या वाढत आहे. त्यांच्यापैकी बरेच ऑस्ट्रिआत प्रवास करण्यासाठी आले होते. बहुतेक लोक तांत्रिक शिक्षण घेतलेले आहेत. पण कांही डॉक्टरांसारखे बुद्धिजीवीही आहेत. सर्वांनाच त्यांच्या कौशल्याला साजेसे काम मिळत नाही. म्हणून पडेल ते शारीरिक कष्ट करणे त्यांना भाग पडत आहे.

### आरामशीर कामाचे घातुक आकर्षण

"आशियांतील फार लोकांना कचेरीतील कामे हवी असतात आणि मग ती उपलब्ध करू न शकणाऱ्या समाजाविरुद्ध ते बंड पुकारतात. 'स्वस्त' शाळा आणि विद्यापीठे अशा नोकऱ्या शोधणारांची यंत्राप्रमाणे मोठ्या प्रमाणावर निर्मिती करीत आहेत. फार थोड्या नोकऱ्या आणि त्या मिळविण्याची धडपड करणारांची फार मोठी संख्या, ही सुशिक्षितांच्या बेकारीची कहाणी आहे. तरुणांना शेतीकडे आणि हाताने करावयाच्या कामाकडे वळविले पाहिजे. युरोपातील आणि अमेरिकेतील औद्योगिक देशांच्या शिक्षणपद्धतीचे आपण अंधानुकरण करीत आहो; पण आशियातील समस्या सोडविण्यास ती शिक्षणपद्धती अपात्र ठरत आहे. विद्यार्थ्यांत व्यवसायाची लहानपणीच आवड निर्माण करण्यात आली पाहिजे, नाहीतर कारकुनी हेच त्यांचे ध्येय राहील."

—एम्प्लॉयर्स फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री. नवल एच. टाटा ह्यांचे टोकियो येथे भाषण.

**अर्थ** (पाक्षिक)
महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते. वा. व. रु. ६=०० ट. ख. सह
"दुर्गाधिवास" पुणे ४.




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.